# शांतता कमिटीची बैठक संपन्न

*(पान १ वरुन)* अपप्रचार आणि चिथावणीखोर प्रकार केल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. शिवजयंती सर्वांनी उत्साहात साजरी करावी. त्यासाठी प्रशासनाचे योग्य ते सहकार्य मिळेल. कायदा आणि सुव्यवस्थेचे सर्वांनी पालन करण्याचे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले.

माजी नगरसेवक हेमंत पाटील मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, शहरात दि.१६ रोजी सायंकाळी व्याख्यान होणार आहे. तर दि.१९ रोजी पहाटे दीपप्रज्वलन व आरती, सकाळपासून शहरातील महापुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण, रांगोळी स्पर्धा, गडकिल्ले स्पर्धा, मोटारसायकल रॅली आणि सायंकाळी मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व कार्यक्रमांमध्ये मुस्लीम बांधवांनी सहभागी होण्याचे आवाहन करुन प्रशासनाने योग्य ते सहकार्य करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

माजी नगरसेवक रज्जाक कुरेशी, राजेश सोनवणे, पत्रकार रत्नदीप सिसोदिया, संजय पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले.

बैठकीचे प्रास्ताविक पोनि के.के.पाटील यांनी केले. सूत्रसंचालन व आभार पीएसआय हेमंत खैरनार यांनी मानले.

## पोलीस ठाण्यातील दारुसाठा केला नष्ट

***शिरपूर/प्रतिनिधी***

शिरपूर पोलीस ठाण्यात विविध गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला साडेचार लाखांचा मद्यसाठा पोलीसांनी नष्ट केला.

याबाबत वृत्त असे की, मा.न्यायालय व राज्य शासनाने पोलीस प्रशासनासाठी १०० दिवसांचा कृती आराखडा तयार केला आहे. त्याअंतर्गत पोलीस ठाणे आवारात गुन्ह्यात जप्त असलेल्या साहित्य नष्ट करण्याचा नियोजन करण्यात आले आहे.

शिरपूर पोलीस ठाण्यात गेल्या काही महिन्यांमध्ये विविध गुन्ह्यातील साडेचार लाखांचा मद्यसाठा पडून होता. नुकताच पोनि के.के.पाटील, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे नेहूल यांच्या उपस्थितीत पोलीस कर्मचाऱ्यांनी मद्यसाठी नष्ट केला.

# गुरे मेळाव्याला सुरवात

*(पान १ वरुन)* सिंध, मारवाडी, काठेवाडी असे जातीवंत घोड्यांचा समावेश आहे. तसेच चांगल्या प्रतिचे बैल देखील विक्रीस आले आहेत.

रशिद अहमद जमील अहमद रा.धौरातांडा (उत्तरप्रदेश) यांनी विक्रीस आणलेल्या घोड्यांपैकी ४ लाख रुपये किंमतीचा घोडा पुणे येथील आदेश अर्जुन गुलाबे यांनी विकत घेतला. तसेच अरुण वासुदेव बडगुजर रा.थाळनेर यांनी विक्रीस आणलेली गीर जाफर म्हैस २ लाख ६० हजार किंमतीस मनोहर शांताराम पारधी रा.आढे यांनी विकत घेतली. या म्हशीचे खास वैशिष्ट्य म्हणजे सदर म्हैस दररोज २५ लीटर दूध देत असून, ती १६ ते १७ महिन्यांपर्यंत दुध देणारी म्हैस आहे. आजपर्यंत शिरपूर बाजार समितीमधील म्हशींच्या किंमतीचा नवा उच्चांक आहे.

बाजार समितीत गुरांच्या मेळाव्यात मोठ्या प्रमाणात घोडे व बैल विक्रीस आले असल्याने जास्तीत जास्त शेतकरी बांधव व घोडे खरेदीदार यांनी बाजार समितीत खरेदी-विक्रीसाठी यावे असे आवाहन बाजार समितीतर्फे करण्यात आले आहे.

# जाहीर सूचना

जा.क्र.४०८०/सा.प्र./२०२४-२५
शिरपूर वरवाडे नगरपरिषद
दिनांक : १४/०२/२०२५

याद्वारे सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या कलम ३(१) नुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी, ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिल अधिकारी आणि नियमत कालमर्यादा या अधिनियमाखाली अधिसूचित करील अशी तरतूद आहे.

त्यानुसार शिरपूर वरवाडे नगरपरीषद, शिरपूरमार्फत पुरविण्यात येत असलेल्या सेवा १३/०२/२०२५ रोजी अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत.

**श्री.प्रशांत सरोदे**
मुख्याधिकारी
**शिरपूर वरवाडे नगरपरिषद, शिरपूर**

जेसीबी मशीन व ट्रीपर भाड्याने मिळेल

पी.एल.चौधरी
(गव्ह.कॉन्ट्रॅक्टर)
निमझरी नाका,शिरपूर जि.धुळे
मोबा.९४२३१९१३८४,
९४२३९०६२२२, ९८५००५०३८२

विश्वास आणि सचोटीचा मानबिंदू!
श्री महालक्ष्मी ज्वेलर्स
सराफ बाजार,शिरपूर जि.धुळे

सर्व प्रकारचे सोन्याचे व चांदीचे दागिणे मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण
प्रोप्रा.जितेंद्र जनार्दन पोतदार, ऋषिकेश जितेंद्र पोतदार
फोन : (०२५६३) २५५२०२,२५५६०३

नवीन स्टॉक उपलब्ध
सुटींग, शर्टींग, पंजाबी सूट, लेडीज टॉप, जीन्स, साड्या आणि रेडिमेडचा भरपूर नवीन स्टॉक. आहेरच्या साड्या मिळतील
घागरा-ओढणी, लाचा, सुरत, कलकत्ता साडी नवीन व्हारायटी व फॅन्सी साडीचे एकमेव ठिकाण व तसेच रेडीमेडमध्ये शिला ड्रेस व सर्व नवीन व्हरायटीसह कोट-पॅन्ट, शेरवाणी उपलब्ध. तरी आपण एकदा अवश्य भेट द्या.
अग्रवाल कलेक्शन
मेनरोड, शिरपूर जि.धुळे, मोबा : ९४२२७९३२६०

वीस वर्षापासून प्रवाशांच्या सेवेत...
परत नवीन बसेसची सुरुवात
.....सुखाचा प्रवास: प्रवासाचे सुख!


नवकार ट्रॅव्हल्स
पुण्यासाठी स्लीपर कोच,पनवेलसाठी नव्या गाड्या
प्रवाशांच्या सोयीसाठी नवकार ट्रॅव्हल्स् शिरपूर- पुणे एसी एअर सस्पेंशन स्लीपर कोच सुरु आहे.
नियमित शिरपूर सेवा : बोरिवली व्हाय सायन ७.३० वा.,मुंबई जेजे- ७.३० वा., पनवले उ.नगर व्हाया - ७.३० वा. पुना संगमनेर व्हाया वारजे ८ वा., पुणे नगर व्हाया निगडी ८.०५ वा.
नवकार ट्रॅव्हल्स्
मेनरोड, शिरपूर २५६४९९, २५८४९९, २५९४९९
www.navkartravel in.www.redbus in.www.trvelyaatri.com